दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

संदर्भ : मा.सं./जनसंपर्क/प्रेस नोट/६३

## वृत्तपत्र निवेदन

## महानिर्मिती करणार प्रकल्पग्रस्त गांवांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी (महानिर्मिती) च्या विद्युत केंद्र व वीज प्रकल्प विस्तारासाठी परिसरातील ज्या गावांची जमीन संपादित करण्यात आली आहे अशा गांवातील विद्यार्थ्यांचा लवकरच सत्कार करण्यात येणार आहे. उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत (इयत्ता १२ वी) आणि माध्यमिक शालांत परीक्षेत (इयत्ता १० वी) मध्ये ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविलेले आहेत अशा विद्यार्थ्यांचा वीज केंद्र परिसरात १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १०००/– आणि १०वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. ७००/– रोख देऊन सत्कार करण्यात येणार आहे. "कंपनीचे सामाजिक उत्तरदायित्व" या धोरणांतर्गत महानिर्मितीतर्फे ही अभिनव योजना राबविण्यात येत आहे, हे विशेष.

सदर उपक्रमाअंतर्गत चंद्रपूर विद्युत केंद्र परिसरातील पुढील प्रकल्पग्रस्त गावांना लाभ होणार आहे. आंबेझरी, भामडेळी (चक), भामडेळी (माळ), चंदनखेडा, चिचोली, चोरा, घोडबादेव (रयतवारी), घोडे–मिनवट, गुळगांव (माळ), गुळगांव (तुकूम), काटवल (रयतवारी), काटवल (तुकूम), कोकेवाडा (मानकर), कोंढेगांव (माळ), कोंढेगांव (तुकूम), मिनवट, मिनवट (तुकूम), मोहर्ली, मुधोळी, नागपूर (रयतवारी), पाचगांव (तुकूम), पांचगांव (मुसलमान), पारडी, सावरी, सिंदेगव्हाण, सिताराम पेठ, टेकाडी, ठाणेगांव, विलोडा, विसापूर (रयतवारी), वायगांव (रयतवारी), वायगांव (तुकूम), वाडेगांव, आवंढा (रयतवारी), चालबर्डी (रयतवारी), घोडपेठ, गुंजाळा (रयतवारी), कचराळा (रयतवारी), सायवन, तिरवंजा, तिरुर, कोंढी (माळ), दुर्गापूर, नेरी, ऊर्जानगर, अंभोरा, खैरगांव, पायली, भटाळी, पद्मापूर, वडगांव, देवई गोविंदपूर (तुकूम), देवई गोविंदपूर (रयतवारी)

तसेच सदर उपक्रमाअंतर्गत कोराडी व खापरखेडा विद्युत केंद्र परिसरातील पुढील प्रकल्पग्रस्त गावांना लाभ होणार आहे. कोराडी अंतर्गत मौजा कोराडी, मौजा महादुला, मौजा भोकारा, मौजा खसाळा (मसाळा पुनर्वसन), मौजा सुरादेवी, मौजा बिना तर खापरखेडा अंतर्गत चिचोली (सावनेर), भानेगांव (सावनेर), कवठा (कामठी), खैरी (कामठी), वारेगांव (कामठी), सिलेवारा (सावनेर), चनकापूर (सावनेर), रनाळा (सावनेर), पिंपळा (सावनेर), कवदास (सावनेर), पाटणसावंगी (सावनेर), टाकळी (सावनेर), मानेगांव (सावनेर), मालेगांव (सावनेर), पांढराखेडी (सावनेर), पटखाखेडी (सावनेर), आंगेवाडा (सावनेर), वाघोळा (सावनेर), सुरादेवी (कामठी), चिखली (नागपूर), पांजरा (नागपूर), कोराडी (कामठी), बांजरी इत्यादी गावांचा समावेश आहे.

वरील गांवातील प्रकल्पबाधित उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी नमुना प्रपत्रकात नि:शुल्क अर्ज संबंधित मुख्य महाव्यवस्थापक (सं. व सु.), किंवा कार्यालयातील कल्याण अधिकारी यांच्या विभागात उपलब्ध करून देण्यात आले आहे.

---

दिनांक : ०७/०८/२०१०.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर वृत्तपत्रीय निवेदन आपल्या माहितीकरिता सोबत जोडत आहे.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**